RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ६, अंक ६] गुरुवार, जानेवारी २३, २०२०/माघ ३, शके १९४१ [पृष्ठे २ किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

### सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जानेवारी २०२०.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर-१०१३/प्र.क्र.५०/१३/१४-अ.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१८ यामध्ये सुधारणा करण्याकरिता पुढील नियम करीत आहेत :—

१. (१) या नियमांना बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक " गट-क (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

(२) हे नियम दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल.

२. बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१८ मधील पाचव्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, आणखी असे की, सदर सेवाप्रवेश नियम **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध होणाऱ्या दिनांकापूर्वी गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि या नियमाच्या खंड (ख) च्या उपखंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण केली आहे, अशा व्यक्तींचा देखील हे नियम प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षांपर्यंत वरील खंड (क) अंतर्गत पदोन्नतीसाठी विचार करता येईल. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. वि. कुलकर्णी,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd January 2020

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. RTR-1013/C.R.50/13/14-A.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules to amend the Clerk-Typist, Group C in the Government offices in Brihan Mumbai (Recruitment) Rules, 2018, as follows, namely :—

1. (*1*) These rules may be called the Clerk-Typist, Group C in the Government offices in Brihan Mumbai (Recruitment) (Amendment) Rules, 2020.

(*2*) These rules shall be deemed to have come into force with effect from the 21st February 2018.

2. In rule 3 of the Clerk-Typist, Group C in the Government offices, in Brihan Mumbai (Recruitment) Rules, 2018, after the fifth proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, the persons who are holding the post in Group " D " and who have passed the Secondary School Certificate Examination and possess qualifications mentioned in sub-clause *(iii)* of clause *(b)*, before the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette,* shall also be considered for promotion under clause *(a)* above, for next five years from the date of publication of these rules.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. V. KULKARNI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.